Vol 2 Issue 11 May 2013

Impact Factor : 1.2018 (GISI)

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 11, May. 2013
**ISSN:-2231-5063**

Available online at www.aygrt.isrj.net

ORIGINAL ARTICLE

GRT

# *आरोग्य केंद्राचे भौगोलिक वितरण : विशेष संदर्भ सोलापूर जिल्हा*

*सदानंद गोने*

उज्वल ग्रामीण महाविद्यालय,घोणसी ता.जळकोट जि.लातूर

***सारांशः***

मानवी भूगोलाची एक शाखा म्हणून वैद्यकीय भूगोलाचा अभ्यास केला जातो. त्या–त्या प्रदेशातील लोकसंख्येस पूरविल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांचा अभ्यास केला जातो. विविध प्रदेशातील लोकांच्या आरोग्यासाठी त्या–त्या प्रदेशातील लोकांना आरोग्य सेवा मूबलक प्रमाणात पुरविणे आवश्यक आहे. आरोग्य केंद्रामार्फत पुरविली जाणारी आरोग्य सेवा ही एक प्रमुख सेवा आहे. जिल्हयात एकूण 113 आरोग्य केंद्र आहेत. जिल्हयातील एकूण आरोग्य केंद्रापैकी सर्वाधिक 19 आरोग्य केंद्र हे माळशिरस तालुक्यात आहेत. तर सर्वात कमी आरोग्य केंद्र हे करमाळा, उत्तर सोलापूर व मंगळवेढा या तालुक्यात प्रत्येकी 07 एवढे आहेत. यावरुन जिल्हयात आरोग्य केंद्राचे वितरण हे असमान स्वरुपाचे असलेले दिसून येते. आरोग्य केंद्राच्या भौगोलिक वितरणाचा अभ्यास करण्यासाठी जिल्हयातील एकूण ग्रामीण क्षेत्र, ग्रामीण वस्त्या व ग्रामीण लोकसंख्या या भौगोलिक घटकांचा आधार घेतलेला आहे. जिल्हयातील उपलब्ध असलेल्या या आरोग्य केंद्राची संख्या आणि ग्रामीण क्षेत्र, ग्रामीण वस्त्या व ग्रामीण लोकसंख्या यांच्या प्रमाणात पुरेशी आहे किंवा नाही याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला गेला आहे.

***प्रस्तावना :–***

जिल्हयातील ग्रामीण क्षेत्र, ग्रामीण वस्त्या, ग्रामीण लोकसंख्या व आरोग्य केंद्र यांच्या प्रमाणाचा अभ्यास केला असता संपूर्ण जिल्हयात ग्रामीण क्ष़ेत्र व वस्त्यांच्या प्रमाणात जिल्हयात 114 आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे. परंतु लोकसंख्येच्या प्रमाणात संपूर्ण जिल्हयात 113 आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे. काही तालुक्यात हेच प्रमाण कमी अधिक असल्याचे दिसून येते.

***अभ्यास क्षेत्र :***

महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्हा हा क्षेत्रफळ व लोकसंख्येच्या दृष्टीने एक महत्त्वाचा जिल्हा मानला जातो. सोलापूर जिल्हयाचा विस्तार 17010' उत्तर अक्षांश ते 18032' उत्तर अक्षांश आणि 74042' पूर्व रेखांश ते 76015' पूर्व रेखांश आहे.

सोलापूर जिल्हयाची उत्तर दक्षिण लांबी 200 कि.मी. असून पूर्व पश्चिम लांबी 150 कि.मी. आहे. सोलापूर जिल्हयाच्या पश्चिम बाजूला सहयाद्रीच्या रांगा पसरल्या असून पूर्वेकडे उस्मानाबादचे पठार पसरले आहे. नैऋत्यकडे सांगली, पश्चिमेकडे सातारा, वायव्येकडे पुणे, उत्तरेकडे अहमदनगर तर पुर्वेकडे उस्मानाबाद जिल्हा आहे. तसेच दक्षिणेकडे कर्नाटकातील विजापूर जिल्हा आहे. सोलापूर जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्रफळ 14547 चौ.कि.मी. असून हे महाराश्ट्राच्या एकूण क्षेत्रफळाच्या 4.82 टक्के आहे. सोलापूर जिल्हयाची एकूण लोकसंख्या 26,24,259 (2001) असून जी महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या 4.9 टक्के इतकी आहे. प्रशासकीयदृष्टया सोलापूर जिल्हा हा करमाळा, बार्शी, माढा, माळशिरस, मोहोळ, पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर या 11 तालुक्यांमध्ये विभागला आहे. या जिल्हयातून भीमा, सीना व माण इ. नद्या वाहत जातात. या सर्व नद्या कृष्णा नदीच्या उपनद्या आहेत.

***उद्दिश्टये :***

प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यासाठी खालील मुख्य उद्दिश्टे विचारात घेतलेली आहेत.

1) सोलापूर जिल्हयातील आरोग्य केंद्राच्या भौगोलिक वितरणाचा अभ्यास करणे.
2) सोलापूर जिल्हयातील अपेक्षित आरोग्य केंद्राचा अभ्यास करणे.

***आकडेवारी संकलन व अभ्यास पध्दती :***

प्रस्तूत शोधनिबंधासाठी वापरलेली आकडेवारी ही दुय्यम स्वरुपाची असून ती जिल्हयाच्या वेगवेगळया अहवालावरुन घेतलेली आहे. त्याकरिता जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, जिल्हा गॅझीटीयर, जिल्हा जनगणना अहवाल इत्यादींमधून ही माहिती संकलित केलेली आहे. तसेच संकलीत केलेल्या आकडेवारीवर संस्करण करुन ती वापरण्यात आलेली आहे. सोलापूर जिल्हयातील ग्रामीण वस्तीमध्ये उपलब्ध असलेले आरोग्य केंद्र या सुविधांच्या क्षमतेची गणना करुन श्रेणी निश्चित केलेली आहे.

**Title :** *'आरोग्य केंद्राचे भौगोलिक वितरण : विशेष संदर्भ सोलापूर जिल्हा*
**Source:Golden Research Thoughts [2231-5063]** *सदानंद गोने* **yr:2013 vol:2 iss:11**

आरोग्य केंद्र या सेवा सुविधांच्या क्षमतेची निश्चित करण्यासाठी खालील समीकरणाचा उपयोग केलेला आहे.

$$Xie \quad \frac{Pi}{MP}$$

Xie= तालुक्यातील सेवा सुविधांची अपेक्षित संख्या

Pi= तालुक्यातील एकूण ग्रामीण लोकसंख्या

MP=जिल्हयातील प्रति एका सुविधेवर अवलंबून असलेली लोकसंख्या

$$MP \quad \frac{P}{Fi}$$

P= जिल्हयातील एकूण लोकसंख्या

Fi= प्रत्येक एका सेवा सुविधांची एकूण संख्या

### *आरोग्य केंद्राचे वितरण :*

संपूर्ण जिल्हयात एकूण 113 आरोग्य केंद्र आहेत. यापैकी सर्वाधिक 19 आरोग्य केंद्र हे माळशिरस तालुक्यात तर सर्वात कमी आरोग्य केंद्र हे करमाळा, उत्तर सोलापूर व मंगळवेढा या तीन तालुक्यात प्रत्येकी 07 एवढी आहेत. सोलापूर जिल्हयातील तहसिलनिहाय आरोग्य केंद्राच्या वितरणाचा अभ्यास केला असता हे वितरण असमान असल्याचे दिसून येते. माळशिरस नंतर पंढरपूर तालुक्यात 13, माढा व बार्शी तालुक्यात प्रत्येकी 12 तर मोहोळ व अक्कलकोट तालुक्यात प्रत्येकी 10 आणि सांगोला व दक्षिण सोलापूर तालुक्यात प्रत्येकी 08 एवढी आरोग्य केंद्र असल्याचे दिसून येते.

सोलापूर जिल्हयातील आरोग्य केंद्राचे वितरण हे असमान असल्यामुळे काही तालुक्यात आरोग्य केंद्राची संख्या अधिक आहे तर काही तालुक्यात आरोग्य केंद्राची संख्या कमी आहे. ज्या तालुक्यात आरोग्य केंद्राची संख्या अधिक आहे त्या तालुक्यातील लोकांना आरोग्य सेवा पुरेशा प्रमाणात मिळतात. तर ज्या तालुक्यात आरोग्य केंद्राची संख्या कमी आहे त्या तालुक्यातील लोकांना मिळणाऱ्या आरोग्य सुविधा या कमी प्रमाणात मिळतात.

आरोग्य सेवा पुरेशा प्रमाणात मिळण्याकरिता त्या प्रदेशात पुरेसे आरोग्य केंद्र उपलब्ध असावी लागतात. यासाठी अभ्यास क्षेत्रातील एकूण ग्रामीण क्षेत्र, एकूण ग्रामीण वस्त्या व एकूण ग्रामीण लोकसंख्या यांच्या प्रमाणावरुन आरोग्य केंद्राचा अभ्यास केला आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, काही तालुक्यात आरोग्य केंद्र अतिरिक्त आहेत तर काही तालुक्यात आरोग्य केंद्राची कमतरता असल्याचे दिसून येते.

सोलापूर जिल्हयात असलेल्या आरोग्य केंद्राचा आणि ग्रामीण क्षेत्र, ग्रामीण वस्त्या व ग्रामीण लोकसंख्या यांच्या प्रमाणाचा अभ्यास केला असता दर 128.73 चौ.कि.मी. ला एक आरोग्य केंद्र असणे गरजेचे आहे. तर वस्त्यांच्या प्रमाणात हेच प्रमाण दर 10.07 वस्त्यासाठी एक आरोग्य केंद्र आणि दर 23223.53 लोकसंख्येमागे एका आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे.

### *ग्रामीण क्षेत्र आणि अपेक्षित आरोग्य केंद्र :*

संपूर्ण अभ्यास क्षेत्रात दर 128.73 चौ.कि.मी. ला एक आरोग्य केंद्र असणे गरजेचे आहे. ग्रामीण क्षेत्राच्या प्रमाणात अपेक्षित आरोग्य केंद्राचा अभ्यास केला असता संपूर्ण जिल्हयात 114 आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे. तहसिलनिहाय ग्रामीण क्षेत्र आणि अपेक्षित आरोग्य केंद्राचा अभ्यास केला असता सर्वाधिक आरोग्य केंद्र करमाळा, माढा, माळशिरस व सांगोला या चार तालुक्यात प्रत्येकी 12 एवढे असणे गरजेचे आहे. तर सर्वात कमी उत्तर सोलापूर तालुक्यात 06 आरोग्य केंद्र अपेक्षित आहेत. करमाळा, माढा, माळशिरस व सांगोला या चार तालुक्यानंतर बार्शी, मोहोळ आणि अक्कलकोट तालुक्यात प्रत्येकी 12 पंढरपूर 10, दक्षिण सोलापूर 09 आणि मंगळवेढा तालुक्यात 08 आरोग्य केंद्र ग्रामीण क्षेत्राच्या प्रमाणात असणे अपेक्षित आहे.

### *ग्रामीण वस्त्या व अपेक्षित आरोग्य केंद्र :*

सोलापूर जिल्हयातील एकूण ग्रामीण वस्ती व आरोग्य केंद्राच्या प्रमाणाचा अभ्यास केला असता दर 10.07 ग्रामीण वस्तीमागे एक आरोग्य केंद्र असणे गरजेचे आहे. तहसिलनिहाय वस्ती व आरोग्य केंद्राच्या प्रमाणाचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, सर्वाधिक 14 आरोग्य केंद्र बार्शी तालुक्यात असले पाहिजेत. तर सर्वात कमी आरोग्य केंद्र हे उत्तर सोलापूर तालुक्यात 04 एवढे असले पाहिजेत. सोलापूर जिल्हयात बार्शी तालुक्यानंतर अक्कलकोट 13, करमाळा, माढा आणि माळशिरस तालुक्यात प्रत्येकी 12, मोहोळ, पंढरपूर आणि सांगोला तालुक्यात प्रत्येकी 10, दक्षिण सोलापूर तालुक्यात 09 आणि मंगळवेढा तालुक्यात 08 एवढी आरोग्य केंद्र ग्रामीण वस्त्यांच्या प्रमाणात अपेक्षित आहेत.

### *ग्रामीण लोकसंख्या व अपेक्षित आरोग्य संख्या :*

ग्रामीण लोकसंख्या आणि आरोग्य केंद्राचे प्रमाण पाहिले असता दर 23223.53 लोकसंख्येमागे एक आरोग्य केंद्र असणे अपेक्षित आहे. ग्रामीण लोकसंख्या व आरोग्य केंद्र यांच्या प्रमाणाचा तहसिलनिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक 18 आरोग्य केंद्र माळशिरस तालुक्यात असणे गरजेचे आहे. तर सर्वात कमी आरोग्य केंद्र उत्तर सोलापूर तालुक्यात 04 असणे गरजेचे आहे. माळशिरस नंतर पंढरपूर तालुक्यात 13, माढा 12, मोहोळ व सांगोला तालुक्यात प्रत्येकी 11, बार्शी व अक्कलकोट तालुक्यात प्रत्येकी 10, करमाळा व दक्षिण सोलापूर तालुक्यात प्रत्येकी 09 आणि मंगळवेढा तालुक्यात 06 आरोग्य केंद्र ग्रामीण लोकसंख्येच्या प्रमाणात असणे गरजेचे आहे.

### *ग्रामीण क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्येच्या प्रमाणात सरासरी अपेक्षित आरोग्य केंद्र :*

ग्रामीण क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्या व आरोग्य केंद्राच्या प्रमाणाचा अभ्यास केला असता याचे प्रमाण वेगवेगळे आलेले दिसून आलेले आहे. क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्यांच्या प्रमाणानुसार आवश्यक असलेल्या आरोग्य केंद्राची सरासरी काढली असता या तिन्ही घटकांचे

सरासरी आरोग्य केंद्र हे सर्वाधिक 14 माळशिरस तालुक्यात असणे गरजेचे आहे. तर सर्वात कमी 05 आरोग्य केंद्र हे उत्तर सोलापूर तालुक्यात असणे गरजेचे आहे. माळशिरस नंतर माढा व बार्शी तालुक्यात प्रत्येकी 12, करमाळा, मोहोळ, पंढरपूर, सांगोला आणि अक्कलकोट या पाच तालुक्यात प्रत्येकी 11, दक्षिण सोलापूर तालुक्यात 09 आणि मंगळवेढा तालुक्यात 07 आरोग्य केंद्र अपेक्षित आहेत.

*तक्ता क्र.1*
*सोलापूर जिल्हयातील आरोग्य केंद्राचे वितरण (2001)*

| तहसिल | आरोग्य केंद्राची संख्या | ग्रामीण क्षेत्र चौ.कि. मी. | ग्रामीण वस्त्यांची संख्या | ग्रामीण लोकसंख्या | क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्येच्या प्रमाणात अपेक्षित आरोग्य केंद्र | | | सरासरी अपेक्षित आरोग्य केंद्र | प्रत्यक्षात आणि अपेक्षित आरोग्य केंद्रातील बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | क्षेत्र | वस्ती | लोकसंख्या | | |
| करमाळा | 07 | 1570 | 118 | 211388 | 12 | 12 | 09 | 11 | +04 |
| माढा | 12 | 1538 | 116 | 269834 | 12 | 12 | 12 | 12 | बदल नाही |
| बार्शी | 12 | 1447 | 137 | 23846 | 11 | 14 | 10 | 12 | बदल नाही |
| उ.सोलापूर | 07 | 711 | 40 | 88325 | 06 | 04 | 04 | 05 | –02 |
| मोहोळ | 10 | 1408 | 101 | 252526 | 11 | 10 | 11 | 11 | +01 |
| पंढरपूर | 13 | 1292 | 100 | 311328 | 10 | 10 | 13 | 11 | –02 |
| माळशिरस | 19 | 1522 | 117 | 422600 | 12 | 12 | 18 | 14 | –05 |
| संगोला | 08 | 1482 | 102 | 243961 | 12 | 10 | 11 | 11 | +03 |
| मंगळवेढा | 07 | 989 | 81 | 149555 | 08 | 08 | 06 | 07 | बदल नाही |
| द.सोलापूर | 08 | 1195 | 91 | 210774 | 09 | 09 | 09 | 09 | +01 |
| अक्कलकोट | 10 | 1384 | 135 | 227922 | 11 | 13 | 10 | 11 | +01 |
| जिल्हा | **113** | **14547** | **1138** | **2624259** | **114** | **114** | **113** | **114** | +01 |

स्त्रोत : जिल्हा आर्थिक, सामाजिक समालोचन, सोलापूर जिल्हा 2001

***प्रत्यक्ष व अपेक्षित आरोग्य केंद्रातील बदल :***

अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण क्षेत्र, वस्त्या, लोकसंख्या आणि आरोग्य केंद्र यांच्या प्रमाणाच्या सरासरीवरुन हे स्पष्ट होते की, काही तालुक्यात प्रत्यक्ष आरोग्य केंद्राची संख्या अतिरिक्त आहे तर काही तालुक्यात प्रत्यक्ष आरोग्य केंद्राची संख्या कमी आहे. ज्या तालुक्यात आरोग्य केंद्राची संख्या ही अपेक्षीत आरोग्य केंद्राच्या संख्येपेक्षा अधिक असेल तर तेथील लोकांना पुरेशा आरोग्य सेवा उपलब्ध होतात. परंतु ज्या तालुक्यात प्रत्यक्ष आरोग्य केंद्राची संख्या अपेक्षीत आरोग्य केंद्राच्या संख्येपेक्षा कमी असेल तर त्या प्रदेशातील लोकांना पुरेशा प्रमाणात आरोग्य सेवा मिळत नाही. त्यामुळे अशा तालुक्यात नवीन आरोग्य केंद्र निर्माण करणे गरजेचे आहे.

उत्तर सोलापूर, पंढरपूर व माळशिरस या तालुक्यात अपेक्षित आरोग्य केंद्रापेक्षा प्रत्यक्ष आरोग्य केंद्र हे अधिक असल्याचे दिसून येते-(तक्ता कं.1).

अभ्यास क्षेत्रातील प्रत्यक्षातील आरोग्य केंद्र आणि अपेक्षित आरोग्य केंद्र यांचा अभ्यास केला असता प्रत्यक्षात सर्वाधिक आरोग्य केंद्र हे माळशिरस तालुक्यात 19 एवढी आहेत परंतु या तालुक्यात ग्रामीण क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्येच्या या तिन्हीच्या सरासरी प्रमाणात फक्त 14 आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे. म्हणजे या तालुक्यात प्रत्यक्षात 05 आरोग्य केंद्र हे अतिरिक्त आहेत. यामुळे या तालुक्यातील लोकांना पुरेशा व मुबलक प्रमाणात आरोग्य सुविधा उपलब्ध होतात. त्याचबरोबर उत्तर सोलापूर व पंढरपूर या तालुक्यात अनुक्रमे 07 व 13 आरोग्य केंद्र आहेत.या तालुक्यात अपेक्षीत आरोग्य केंद्र अनुक्रमे 05 व 11 एवढी आहेत. म्हणजेच उत्तर सोलापूर व पंढरपूर या तालुक्यात प्रत्येकी 02 आरोग्य केंद्र हे अतिरिक्त आहेत.

सोलापूर जिल्हयातील ग्रामीण क्षेत्र, वस्त्या व लोकसंख्या आणि आरोग्य केंद्र यांच्या प्रमाणाच्या सरासरीच्या आधारे अपेक्षित आरोग्य केंद्राची संख्या पाहिली असता करमाळा, मोहोळ, सांगोला, दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट या तालुक्यात प्रत्यक्ष आरोग्य केंद्राची संख्या कमी असल्यामुळे या तालुक्यात नवीन आरोग्य केंद्र निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

करमाळा तालुक्यात प्रत्यक्षात 07 आरोग्य केंद्र अस्तित्वात आहेत. परंतु या तालुक्यात 11 आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे म्हणून या तालुक्यात नवीन 04 आरोग्य केंद्र निर्माण करणे गरजेचे आहे. सांगोला तालुक्यात प्रत्यक्षात 08 आरोग्य केंद्र उपलब्ध आहेत. परंतु या तालुक्यात 11 आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे. म्हणजेच या तालुक्यात नवीन 03 आरोग्य केंद्र निर्माण करावी लागणार आहेत. मोहोळ, दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट या तालुक्यात अनुक्रमे 10, 08 आणि 10 एवढी आरोग्य केंद्र उपलब्ध आहेत. या तिन्ही तालुक्यात अनुक्रमे 11, 09 व 11 एवढया आरोग्य केंद्राची आवश्यकता आहे. म्हणजे या तिन्ही तालुक्यात प्रत्येकी 01 नवीन आरोग्य केंद्र निर्माण करणे गरजेचे आहे.

अभ्यास क्षेत्रातील माढा व बार्शी या तालुक्यात प्रत्यक्ष आरोग्य केंद्र व अपेक्षित आरोग्य केंद्राची संख्या सारखीच म्हणजे 12 एवढी असल्याने या तालुक्यात एकही आरोग्य केंद्र निर्माण करण्याची गरज असल्याचे दिसून येत नाही. तसेच मंगळवेढा तालुक्यात प्रत्यक्ष व अपेक्षित आरोग्य केंद्राची संख्या सारखीच 07 एवढी असल्यामुळे याही तालुक्यात एकही नवीन आरोग्य केंद्र निर्माण करण्याची आवश्यकता नाही.

*निष्कर्ष :*

सोलापूर जिल्हयातील आरोग्य केंद्राच्या वितरणाचा अभ्यास करत असताना या अभ्यास क्षेत्रात एकूण किती आरोग्य केंद्र उपलब्ध आहेत त्यांचे तहसिलनिहाय वितरण कसे आहे हे अभ्यासण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केलेला आहे. हे वितरण अभ्यासत असतेवेळी आरोग्य केंद्र हे त्या त्या प्रदेशात पुरेसे आहेत किंवा नाहीत याचा विचार करण्यात आलेला आहे. याकरिता त्या त्या तहसिलमधील एकूण ग्रामीण क्षेत्र, ग्रामीण वस्त्या व ग्रामीण लोकसंख्या यांचा आधार घेतलेला आहे आणि या तिन्ही घटकांच्या प्रमाणाची पुन्हा सरासरी काढून अपेक्षित आरोग्य केंद्र किती असावीत याचा अभ्यास केलेला आहे.

सोलापूर जिल्हयातील उत्तर सोलापूर, पंढरपूर आणि माळशिरस या तालुक्यात अस्तित्त्वात असलेले आरोग्य केंद्र हे अपेक्षित आरोग्य केंद्रापेक्षा अधिक आहेत. उत्तर सोलापूर आणि पंढरपूर या तालुक्यात प्रत्येकी 02 व माळशिरस तालुक्यात 05 आरोग्य केंद्र हे क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षाही अतिरिक्त आहेत. त्यामुळे या तालुक्यातील लोकांना मुबलक प्रमाणात आरोग्य सेवा उपलब्ध होतात.

करमाळा, मोहोळ, सांगोला, द.सोलापूर आणि अक्कलकोट या तालुक्यात उपलब्ध असलेली आरोग्य केंद्र ही पुरेशी नाहीत. त्या त्या तहसिलचे ग्रामीण क्षेत्र, ग्रामीण वस्त्या व ग्रामीण लोकसंख्या यांच्या सरासरीवरुन तेथे नवीन आरोग्य केंद्र निर्माण करणे गरजेचे आहे. करमाळा तालुक्यात नवीन 04 आरोग्य केंद्र निर्माण करण्याची आवश्यकता आहे. सांगोला तालुक्यात 07 आणि मोहोळ, द.सोलापूर आणि अक्कलकोट या तालुक्यात नवीन एक आरोग्य केंद्र निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

अभ्यास क्षेत्रातील माढा व बार्शी तालुक्यात प्रत्यक्ष अरोग्य केंद्र व अपेक्षित अरोग्य केंद्राची संख्या सारखिच म्हणजे 12 एवढी असल्याने या तालुक्यात एकही अरोग्य केंद्र निर्माण करण्याची गरज असल्याचे दिसून येत नाही. तसेच मंगळवेढा तालुक्यातही प्रत्यक्ष व अपेक्षित आरोग्य केंद्राची संख्या सारखीच 07 एवढी असल्यामुळे याही तालुक्यात एकही नवीन आरोग्य केंद्र निर्माण करण्याची आवश्यकता नाही.

*संदर्भ :*


1)Davies, W.K.D. (1966) : 'The Ranking of Service Centers : A Critical Review Transaction and Paper' Institute of British Geographers, No.40, Page 52.

2)Gopal Kishan and Chanda M.N. (1977) : 'The System of Service Centers in the Outer Himalayas', Published in Mann Culture and Settlement (Edited by Robert C. Singh K.N. and Rana P.B.) New Delhi.

3)Kankure, K.B. (1986) : 'Marathwada : A Study in Settlement Geography', Unpublished Ph.D. Thesis Poona University, Pune.

4)Gone, S.H. (2007) : 'A Study of Geographical Analysis of Market Centres in Parbhani District'. Unpublished Ph.D. Thesis S.R.T.M.U. Nanded.

5)प्राथमिक शाळांचे अभिक्षेत्रीय वितरण : विशेष संदर्भ जालना जिल्हा, Indian Streams Research Journal, Vol-II, Issue IX, Oct.2012 Pp.59 rs 62

6)परभणी जिल्हयातील आरोग्य केंद्राच्या वितरणाचा भौगोलिक अभ्यास, Golden Research Thoughts, Vol-II, Issue IV, Oct. 2012, Pp.64-67

7)गोने, सदानंद (2012) 'परभणी जिल्हयातील प्राथमिक शाळा सुविधांच्या वितरणाचा भौगोलिक अभ्यास', Social Growth, Vol.II, Issue IV, May 2012 to Oct.20212 Pp.156-161

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net